दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET
Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816
■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३४२ ■ गुरूवार, दि. १७ एप्रिल २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -342 ■ Thursday, 17 April 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

# शेतकऱ्यांनो जमिनी विकू नका, दलालांच्या भानगडीत पडू नका

## मुख्यमंत्री फडणवीसांची शेतकऱ्यांना भावनिक साद

**अमरावती**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

विदर्भातील अमरावती येथे विमानतळाचे लोकार्पण केल्यानंतर विदर्भातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदानाचे वाटप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी, भाषण करताना फडणवीसांनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना आणि शेतकऱ्यांना भावनिक साद घातली. शेतकऱ्यांनी जमीन विकली नाही पाहिजे, दलालांच्या भानगडीत पडले नाही पाहिजे, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले. शेतकरी असो की प्रकल्पग्रस्त असो, आता कायदा असा केला आहे की, कोणतेही सरकार आले तरी शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळेल. कोणीतरी येतो आणि शेतकऱ्यांच्या जमिनी विकत घेतो आणि पाचपट दराने तो विकतो. त्यामुळे, शेतकऱ्यांनी जमीन विकू नये, पूर्ण माहिती घ्या कोणालाही बळी पडू नका, असे आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी अमरावती येथील कार्यक्रमातून शेतकऱ्यांना केलं आहे.

आम्ही जमिन अधिग्रहणाची घोषणा केली की कोणीतरी धन्नाशेठ येतो आणि शेतकऱ्यांकडून जमिनी विकत घेतो. त्यानंतर



५ पटीने तेथे पैसे कमावतो. त्यामुळे, ज्याठिकाणी जमीन अधिग्रहण होतोय, त्याठिकाणी तुम्ही जमिनी विकू नका, असे आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी केले. कोणीतरी अचानक तुमची जमीन विकत घेतोय तर माहिती घ्या. हा जमीन का घेतोय. कारण, शेतकऱ्यांना पैसे मिळावे, व्यापाऱ्यांना नको, अशी आमची भावना आहे, असे म्हणत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना देवेंद फडणवीसांनी महत्त्वाचे आवाहन केले आहे. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना येत्या काळात सगळ्यांना पैसे मिळतील, कोणीही आले तर तुम्ही थेट कार्यालयात जा, पण दलालांच्या भानगडीत पडू नका, असा सल्ला देखील फडणवीसांनी शेतकऱ्यांना दिला. तसेच, समृद्धी महामार्ग शेतकऱ्यांसाठी लाईफलाईन बनल्याचेही त्यांनी सांगितले.

**प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय दिला**

२०२२ ला महायुतीचे सरकार आल्यावर मी अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि या प्रश्नावर मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. आमदार प्रताप अडसड मला नेहमी भेटायचे, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण करा म्हणत, मागणी करायचे. कायद्याने आम्हाला मार्ग काढायचा होता. मग आम्ही अधिकाऱ्यांना घेऊन बसलो आणि म्हटले की आपण सानुग्रह अनुदान दिले तर काय होईल. त्यामुळे अखेर निर्णय घेतला आणि जर यात काही अडचण आली तर मी त्याला उत्तर देईल, असे म्हणत देवेंद्र फडणवीसांनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना आपण न्याय मिळवून दिल्याचे म्हटले.

**अमरावतीकरांना विमानसेवा उपलब्ध**

अमरावतीकरांना गेल्या अनेक वर्षांपासून प्रतीक्षा असलेलं विमानतळ

पान ४ वर

## जळगाव : दुर्गम भागात आढळला महिलेचा कुजलेला मृतदेह

जळगाव : सातपुडा पर्वताच्या यावल तालुक्यातील अतिदुर्गम भागातील गाड्या जामन्या आदिवासी या वस्तीच्या भागातून धक्कादायक माहीती समोर येत आहे. या ठिकाणी एका ३० ते ४० वर्ष वयोगटातील महिलेचा अत्यंत कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे या घटने संदर्भात यावल पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे दरम्यान महिलेचा मृत्यू सशस्पद असल्याने घातपात झाल्याची शक्यता येत आहे.

या संदर्भात विश्वसनिय सुत्रांकडून मिळालेली माहीती अशी की, यावल तालुक्यातील अतिदुर्गम भागातील गाड्या जामन्या या ठीकाणी निळकंठ कुटिया जवळ कोरडया तलाव असून, या क्षेत्रातुन वन विभागाचे कर्मचारी जात असतांना त्यांना तलावात अनोळखी अंदाजे ३० ते ४० वर्षीय माहिलेचा अत्यंत कुजलेल्या अवस्थेत मृतदेह दिसुन आला.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळाल्यावर यावल पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदीप ठाकूर यांनी तात्काळ दखल घेत आपल्या पोलीस पथकासह घटनास्थळी धाव घेतली. याबाबत यावल पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली असुन, या अनोळखी महीलेचा मृत्यु कशामुळे झाला याची माहिती अधा अद्यापपर्यंत समोर आलेली नाही, प्राथमिक माहितीनुसार महिलेसोबत घातपात झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. मरण पावलेल्या महिलेचा मृतदेह पोलीसांनी ताब्यात घेत, प्रथमदर्शनी महीलेचा मृत्यु संशयास्पद वाटल्याने तिचा मृतदेह हा यावलहून जळगाव येथे जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला असून पुढील तपस सुरु आहे.

## न्यायमूर्ती भूषण गवई देशाचे ५२ वे सरन्यायमूर्ती म्हणून घेणार शपथ

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयातील सर्वात वरिष्ठ न्यायाधीश भूषण गवई ५२ वे सरन्यायाधीश होणार आहेत.विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी केंद्रीय कायदा मंत्रालयाकडे न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या नावाची पुढील सरन्यायमूर्ती म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार आगामी १४ मे रोजी न्यायमूर्ती गवई हे ५२ वे सरन्यायमूर्ती म्हणून शपथ घेतील. विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना १३ मे रोजी निवृत्त होणार आहेत. त्यानंतर न्यायमूर्ती गवई १४ मे रोजी ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतील आणि पदभार सांभाळतील. न्यायमूर्ती बी. आर. गवई हे २४ मे २०१९ पासून सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी सरन्यायाधीश पदाची शपथ घेतल्यानंतर सहा महिने त्यांचा कार्यकाळ असेल. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी ते निवृत्त होतील. न्यायमूर्ती गवई हे भारताचे सरन्यायाधीश होणारे दुसरे दलित असतील. त्यांच्यापूर्वी २००७ मध्ये दलित न्यायमूर्ती के. जी. बालकृष्णन हे देशाचे सरन्यायाधीश झाले होते. न्यायमूर्ती बी. आर. गवई मुळचे महाराष्ट्रातील आहेत. त्यांचा जन्म अमरावती जिल्ह्यात झाला आहे. १६ मार्च १९८५ रोजी त्यांनी वकिलीला सुरुवात केली. ऑगस्ट १९९२ ते जुलै १९९३ पर्यंत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी वकील म्हणून त्यांची नियुक्ती झाली. १७ जानेवारी २००० रोजी नागपूर खंडपीठात सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाली. १४ नोव्हेंबर २००३ रोजी उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून बढती मिळाली.

## इंग्रजी शाळेत फक्त इंग्रजीतच बोला सांगणाऱ्या शाळांना मनसे स्टाईल उत्तर

ठाणे : महाराष्ट्रात मराठीच्या गळचेपीच्या घटनांची मालिका काही थांबेना. ठाण्यातील इंग्रजी शाळांमध्ये मराठी बोलण्यावर बंदी घालण्यात आली आहे. जिल्ह्यातील अनेक सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाच्या शाळांनी विद्यार्थ्यांना वर्गात मराठीऐवजी इंग्रजी बोलण्याचा दबाव आणला होता. या शाळेला मनसेने मनसे स्टाईलने उत्तर देत दणका दिला आहे.

सध्या मराठी भाषेचा वाद महाराष्ट्रात मिटल्या मिटत नाही आहे. दररोज वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या घटनांमध्ये मराठी भाषेची गळचेपी होतानाचे व्हिडीओ व्हायरल होत आहेत. अशातच ठाणे जिल्ह्यातील सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाच्या शाळांनी विद्यार्थ्यांना वर्गात, शाळेच्या आवारात मराठी बोलण्यावर बंदी घातली होती. तसेच इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मराठी बोलल्याबद्दल अपमानित केले जात असल्याची राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सरचिटणीस संदीप पाचंगे यांनी ठाणे जिल्हा परिषदेकडे याबाबत तक्रार केली होती. मंगळवारी (दि १५ ) शाळेत विद्यार्थ्यांना मराठी बोलण्यापासून रोखल्यास कारवाई करण्याचा इशारा परिषदेने दिला. त्यानुसार जिल्हा परिषदेने या तक्रारीची गांभीर्याने दखल घेतली.

परिषदेचे प्राथमिक शिक्षण अधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी त्यांच्या आदेशात म्हटले आहे की, सर्व शाळांनी मराठी भाषेचा वापर आणि आदर राखणे जरुरीच आहे. जर कोणत्याही शाळेने फक्त इंग्रजी बोलण्याचे धोरण राबवले तर त्या शाळांवर कारवाई केली जाईल. तसेच मराठी भाषेचा वापर केवळ भाषेच्या तासातच करू नये. त्याऐवजी, ते दैनंदिन संभाषणांमध्ये, वर्गातील चर्चांमध्ये, सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये, नाटकांमध्ये आणि भाषण स्पर्धांमध्ये वापरले गेले पाहिजे. शिक्षण विभागाच्या या आदेशाचे मनसेने स्वागत केले आणि शिक्षण व्यवस्थेतील वाढत्या भाषिक असमतोलाला रोखण्यासाठी हे एक आवश्यक पाऊल असल्याचे म्हटले. जिल्हा परिषदेच्या या निर्णयाचं मनसेकडून कौतुक करण्यात आले.

## पुण्यातील प्रसिध्द व्यावसायिकाची बिहारमध्ये हत्या!

पुणे : पुण्यातील व्यावसायिकाची बिहारमध्ये हत्या झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. लक्ष्मण साधू शिंदे या पुण्यातील व्यावसायिकाची बिहारमध्ये हत्या करण्यात आली आहे. कामानिमित्त पाटणा येथे गेलेल्या लक्ष्मण शिंदे यांचा १४ एप्रिल रोजी बिहारमध्ये मृतदेह आढळून आला. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील कोथरूड येथे राहणाऱ्या लक्ष्मण साधू शिंदे यांचा भंगाराचा व्यवसाय आहे. ते पुण्यातील प्रसिध्द व्यावसायिक होते. सायबर चोरट्यांनी कंपनीच्या कामासाठी मेल करत त्यांना पाटण्यात बोलवून घेतले. कंपनीचे काही टूल्स आणि मशीनरी स्वस्त भावात विकत देतो असा मेल आरोपींनी लक्ष्मण शिंदे यांना पाठवला होता. स्वस्तात मशिनरी मिळेल असा विचार करुन शिंदे बिहारला गेले होते. त्यानंतर एअरपोर्टवरून त्यांचे अपरहण करण्याता आले. अपरहणानंतर त्यांच्याकडून पैसे उकळण्याचा प्रयत्न केला गेला. पण त्यांनी पैसे देण्यास नकार दिल्याने चोरटयांनी त्यांची हत्या केल्याचं समोर आलं आहे. आरोपींनी शिंदे यांचा मृतदेह जहानाबाद जिल्ह्यातील घोसी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील झुंकी आणि मानपूर गावादरम्यान येणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग- ३३ वर फेकून दिला.



**छत्रपती संभाजीनगर**
**(प्रतिनिधी)**

कॅनॉट परिसरातील महाराणा प्रताप उद्यानमधील पुतळा आता लोकार्पणासाठी सज्ज झाला आहे. राजनाथसिंग यांच्या हस्ते हा सोहळा पार पडणार आहे. त्याची जय्यत तयारीसाठी सर्वांनीच कंबर कसली आहे. मनपा प्रशासकांनी सविस्तर माहिती घेवून परिसराची पाहणी केली. तसेच तयारीत काही चूक राहू नये यासाठी सूचना केल्या.

# राज्यातील २० आयटीआयमध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारणार

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्यातील २० आयटीआयमध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारणे, सूक्ष्म आणि लघु उद्योजकांना प्रशिक्षण देण्यासाठी उद्योजक मेळावे आयोजित करून रोजगार निर्मिती करणे आणि राज्यातील आयटीआयमध्ये शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या तांत्रिक शिक्षण आणि रोजगार संधी वाढवण्यात येणार आहेत.आज कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि श्री. ग्रामीण विकास कार्यक्रम ट्रस्ट बंगळूरु, स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाऊंडेशन बंगळूरु पुण्याची देआसरा फाऊंडेशन, अंधेरी येथील प्रोजेक्ट मुंबई या सामाजिक संस्थामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आले.

मंत्रालयात मंत्रिमंडळ बैठकीनंतर कौशल्य विकास विभागाचे सामंजस्य करार करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री अजित पवार , कौशल्य रोजगार उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा मंत्रीमंडळातील सदस्य,राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक,कौशल्य विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, कौशल्य विकास आयुक्त नितीन पाटील व्यवसाय व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधवी सरदेशमुख,सहसंचालक सतीश सुर्यवंशी,श्री श्री रुरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे विश्वस्तविजय हाके, स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशनच्या सीएसआर प्रमुख रिचा गौतम, दामिनी चौधरी,प्रोजेक्ट मुंबईचे संचालक जलज दानी, दे आसरा या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पंडित यावेळी उपस्थित होते. युवकांना नवीन तंत्रज्ञान आणि औद्योगिक प्रशिक्षण देण्यासाठी श्री श्री रुरल डेव्हलपमेंट ट्रस्ट तसेच स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन आणि व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्यात हा त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला. श्री रुरल डेव्हलपमेंट प्रोग्राम ट्रस्ट ही एक सेवाभावी संस्था असून ही संस्था प्रशिक्षणार्थ्यांना सॉफ्ट स्किल्स, लिडरशिप व व्यवसाय प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगार व स्वयंरोजगारासाठी, तर स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाऊंडेशन आपल्या सामाजिक दायित्व निधीद्वारे देशभरातील युवकांसाठी शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण, रोजगार व स्वयंरोजगार मिळवण्यासाठी विविध उपक्रमांद्वारे कार्य करते. या कराराच्या माध्यमातून स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाऊंडेशन या संस्थेतर्फे येणाऱ्या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये राज्यातील २० शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून इलेक्ट्रिशियन या व्यवसायाच्या कार्यशाळा ची दर्जा वाढ करण्यात येणार आहे व याचबरोबर सोलार टेक्निशियन लॅब व इंडस्ट्रियल ऑटोमेशन लॅब उभारून देण्यात येणार आहे. याचबरोबर स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाऊंडेशनतर्फे राज्यातील वीजतंत्री व्यवसायाच्या सर्व शिल्प प्रदेशांना बंगळूरु येथे आधुनिक तंत्रज्ञान व सॉफ्ट स्किल्सचे पंधरा दिवसांचे प्रशिक्षण मोफत देण्यात येईल. या सामंजस्य करारामुळे पुढील चार वर्षात टप्प्याटप्प्याने ९७५० प्रशिक्षणार्थ्यांना इलेक्ट्रिशियन व अक्षय ऊर्जा क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान व इंडस्ट्रियल ऑटोमेशन या विषयातील प्रशिक्षणाचा लाभ होणार आहे. यापूर्वीही स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन यांचेकडून अमरावती नाशिक यासारख्या संस्थांमध्ये इलेक्ट्रिशियन व्यवसायाच्या कार्यशाळेत शी दर्जावाढ करून देण्यात आलेली आहे. 'राज्यातील विविध विभागांतील २० शासकीय आयटीआय केंद्रांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, नाशिक इत्यादी विभागांचा समावेश आहे. या प्रकल्पाअंतर्गत २०२५-२६ पासून पुढील चार वर्षांत प्रशिक्षण दिले जाईल. प्रत्येक वर्षी केंद्रांची संख्या आणि प्रशिक्षणार्थ्यांची संख्या वाढवण्यात येणार आहे. पहिल्या वर्षांत १० केंद्रांमध्ये १५०० युवकांना, दुसऱ्या वर्षांत १५ केंद्रांमध्ये २२५०, तिसऱ्या वर्षांत २० केंद्रांमध्ये ३००० युवकांना आणि चौथ्या वर्षात देखील ३००० युवकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. या सामंजस्य करारामुळे पुढील चार वर्षात टप्प्याटप्प्याने ९७५० प्रशिक्षणार्थ्यांना इलेक्ट्रिशियन व अक्षय ऊर्जा क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान व इंडस्ट्रियल ऑटोमेशन या विषयातील प्रशिक्षणाचा लाभ होणार आहे.

## भाजपा - अण्णा द्रमुक युतीचे स्टॅलिनना आव्हान!

तामिळनाडूत एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखाली द्रमुक पक्ष भक्कम पाय रोवून असताना भाजपाने अण्णा द्रमुक पक्षाशी युती केल्याचे जाहीर केले व आगामी विधानसभा निवडणूक अण्णा द्रमुकचे नेते एडप्पादी पलानीस्वामी यांच्या नेतृत्वाखाली युती लढवणार असल्याची भाजपाने घोषणा केली. ही घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी चेन्नईत जाऊन केली आणि स्टॅलिन सरकारचे आता दिवस भरले असा सज्जड इशारा दिला.

संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन नुकतेच संपले. या अधिवेशनाच्या अखेरीस मोदी सरकारने मांडलेल्या वक्फ सुधारणा विधेयकावर लोकसभा व राज्यसभेत वादळी चर्चा झाली. या विधेयकाला विरोध करण्यासाठी भाजपा विरोधक एकवटले होते. वक्फ सुधारणा विधेयक मुस्लिमांच्या विरोधात आहे, अशी खरमरीत टीका काँग्रेस, सपा, तृणमूल काँग्रेस, द्रमुक आदी विरोधी पक्षांनी केली. अण्णा द्रमुकने याच सुरात सूर मिसळला होता. एवढेच नव्हे तर वक्फ सुधारणा सरकारच्या विरोधात अण्णा द्रमुक पक्षाच्या खासदारांनी राज्यसभेत मतदानही केले. मग असे अचानक काय घडले की भाजपा व अण्णा द्रमुक हे दोन्ही पक्ष एकदम जवळ आले? अमित शहा मुत्सद्दी राजकारणी आहेत, तसेच राजकीय कुटनीतीमध्ये ते चाणक्य म्हणून ओळखले जातात. जो राजकीय पक्ष संसदेत भाजपाला साथ देत नाही, ज्या राजकीय पक्षाने गेल्या निवडणुकीत भाजपाशी युती तोडली त्या अण्णा द्रमुकशी भाजपाने पुन्हा युती केली, त्या पक्षाला एनडीएमध्ये दाखल करून घेतले, या सर्व घटना एवढ्या झटपट घडल्या की त्याचे देशातील सर्वच राजकीय पक्षांना आश्चर्य वाटले. तामिळनाडू विधानसभा निवडणुकीसाठी अण्णा द्रमुक पक्षाबरोबर घाईघाईने युती का करण्यात आली हे गूढ अनेकांना उलगडलेले नाही. यापूर्वी भाजपाने आपली ताकद वाढविण्यासाठी सर्व शक्ती पश्चिम बंगालमध्ये पणाला लावली होती, तसेच आता भाजपाने अण्णा द्रमुकची पुन्हा युती करून एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील द्रमुक सरकार चेन्नईच्या तख्तावरून खाली खेचण्याचा चंग बांधला आहे. तामिळनाडूत पक्ष विस्तारासाठी भाजपा गेली दहा-बारा वर्षे अटोकाट प्रयत्न करीत आहे. पण द्रमुक विरुद्ध अण्णा द्रमुक अशा लढाईत भाजपाचे काही फावत नाही हे श्रेष्ठींना कळून चुकले आहे. स्टॅलिन हे करारी नेतृत्व आहे. ते मोदी सरकारपुढे झुकत नाहीत, भाजपापुढे नमत नाहीत आणि परंपरागत राजकीय शत्रू असलेल्या अण्णा द्रमुकला वाढू देत नाहीत. द्रमुकला सत्तेवरून हटवायचे असेल तर आपण दोघांनी एकत्र येणे गरजेचे आहे, याची जाणीव भाजपा व अण्णा द्रमुक या दोन्ही पक्षांना झाली आहे. म्हणूनच राजकीय अरिहार्यतेतून आगामी विधानसभा निवडणूक भाजपा-अण्णा द्रमुक यांची युती लढणार असल्याची घोषणा स्वत: अमित शहा यांनी चेन्नईत येऊन केली.

अण्णा द्रमुकशी युती करण्यात भाजपाचे मावळते प्रदेशाध्यक्ष अन्ना मलाई यांचा मोठा अडथळा होता. त्यांचा अण्णा द्रमुकशी युती करायला कठोर विरोध होता. स्वत: अन्ना मलाई हे लढाऊ नेतृत्व आहे. त्यांनी द्रमुक सरकारच्या विरोधात लढताना पक्षात जान आणली व पक्षाचा पाया भक्कम केला हे मान्य करावेच लागले. जिथे भाजपाला कोणी विचारत नाही, भाजपाची केडर नाही, अशा राज्यात भाजपाच्या मतांची टक्केवारी ३ वरून ११ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात अन्ना मलाई यांचे मोठे योगदान आहे. म्हणूनच अन्ना मलाई यांच्या कामगिरीकडे दुर्लक्ष करणे व त्यांना पदावरून दूर करणे हे भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाला कठीण होऊन बसले होते. अन्ना मलाई हे निवृत्त आयएएस अधिकारी आहेत. ते तरुण आहेत. सन २०१९ मध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली व भाजपात प्रवेश केला. आपल्या दमदार कामाने त्यांनी मोदी-शहांचेही मन जिंकले. त्यांच्या कामाची तडफफ पाहूनच त्यांच्यावर तामिळनाडूच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी दिली. प्रदेशाध्यक्ष झाल्यावर त्यांनी सत्तेवरील द्रमुक सरकारच्या विरोधात जोरदार मोहीम सुरू केली. स्टॅलिन सरकारला सतत ते हैराण करू लागले. सन २०२६ मध्ये तामिळनाडूमध्ये होणारी विधानसभा निवडणूक अन्ना मलाई यांच्याच नेतृत्वाखाली भाजपा लढवणार असे सर्वांना वाटले होते. आगामी विधानसभा निवडणुकीत अन्ना मलाई हेच भाजपाचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा असतील अशीही चर्चा होत असे. राजकारणात दिसते तसे नसते याची प्रचिती सर्वांनाच आली. भाजपा श्रेष्ठींनी भाकरी फिरवली. अचानक अन्ना मलाई यांची प्रदेशाध्यक्षपदावरून पक्षाने उचलबांगडी केली. त्यांना प्रदेशाध्यक्षपदावरून हटविल्याशिवाय द्रमुकशी युती होणार नाही, याची श्रेष्ठींना खात्री होती. म्हणून त्यांच्या जागी नयनार नागेंद्र यांची पक्षाने नेमणूक केली व लगेचच भाजपा-द्रमुक युती झाल्याची घोषणा केली. ६४ वर्षांच्या नयनार नागेंद्रन यांनी भाजपाचे तामिळनाडू प्रदेशाध्यक्ष म्हणून १२ एप्रिल रोजी सूत्रे हाती घेतली. नागेंद्रन हे मृदुभाषी व्यक्तिमत्त्व आहे. दक्षिणी तिरूनेलवेली मतदारसंघातून ते आमदार आहेत. अन्ना मलाईसारखे ते आक्रमक नाहीत, मग पक्षाचा अजेंडा कसा राबवणार? अण्णा द्रमुकचे नेते जे म्हणतील ते मान्य करून युती भाजपाला युती चालवायची आहे. स्टॅलिन सरकारचा पराभव हा एकमेव अजेंडा भाजपा-अण्णा द्रमुक युतीपुढे आहे. लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने तामिळनाडू हे पाचवे मोठे राज्य आहे. भाजपाने कर्नाटकमध्ये जम बसवला, पण केरळ व तामिळनाडूत भाजपाला फारसा शिरकाव करता आला नाही, आता २०२६ च्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने भाजपाने अण्णा द्रमुकला पुन्हा बरोबर घेऊन पक्ष विस्ताराचा अजेंडा तयार केला आहे. सन २०२४ ची लोकसभा निवडणूक भाजपाने स्वबळावर तामिळनाडूत लढवली होती. या निवडणुकीत भाजपाला ११ टक्के मते मिळाली. लोकसभा निवडणुकीत भाजपाचा एकही उमेदवार खासदार म्हणून निवडून आला नाही. तत्कालीन प्रदेशाध्यक्ष अन्ना मलाई हे सुद्धा पराभूत झाले. तामिळनाडूत पक्षाला मोठा आधार नाही व स्वबळावर निवडणूक लढणे हे फायद्याचे नाही हे भाजपा श्रेष्ठींच्या लक्षात आले.

# लोकसभा: रचना व कालावधी!

**लोकसभा हे भारतीय संसदेचे कनिष्ठ सभागृह आहे. लोकसभेचे सदस्य हे जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी असतात. लोकसभेची निवडणूक ही भारतीय प्रौढ नागरिकांचा समावेश असलेल्या मतदारसंघातून निवडून केली जाते. प्रत्येक लोकसभेचा कालावधी हा जास्तीत जास्त ५ वर्षांचा असतो. भारताची पहिली लोकसभा १९५१च्या सार्वजनिक निवडणुकीनंतर दि.१७ एप्रिल १९५२ रोजी अस्तित्त्वात आली. १९५७मध्ये ५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यावर ती विसर्जित केली गेली. ही ज्ञानवर्धक माहिती अलककार- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी देत आहेत.**

### १७ एप्रिल : राष्ट्रीय प्रथम लोकसभा निवड दिन

आजच्या या लेखात आपण सांप्रत १७वी लोकसभा याबद्दलही संपूर्ण माहिती पाहणार आहोत. १७वी लोकसभा भारतामध्ये सद्या अस्तित्वात आहे. भारतासाठी कायदे करणाऱ्या संसदेचा आणि लोकशाही प्रशासन व्यवस्थेचा एक महत्वाचा भाग म्हणजे लोकसभा होय. लोकसभा हे भारतीय संसदेचे कनिष्ठ सभागृह आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ८१ अनुसार तिची तरतूद केली आहे. तसेच धनविषयक प्रस्ताव हा तेथेच मांडला जातो. संसदेचे सभागृह या नात्याने तेथील सदस्यांचे प्रमुख कार्य- भारतीय राज्यघटनेच्या चौकटीशी सुसंगत असे कायदे बहुमताने बनवणे, हे असते. अर्थात हे सदस्य राज्यकारभाराच्या विधिमंडळ शाखेचे सदस्य आहेत. प्रत्येक लोकसभेचा कालावधी जास्तीत जास्त ५ वर्षे असतो. त्यानंतर लोकसभेचे आपोआप विसर्जन होते व नव्या लोकसभेसाठी निवडणुका होतात. याला आणीबाणीची परिस्थिती हा एक अपवाद आहे. आणीबाणीची परिस्थिती जाहीर केल्यास तीचा कालावधी एक वर्षाच्या टप्प्यामध्ये ५ वर्षाहून अधिक काळही वाढवता येतो. लोकसभेस प्रथम सभागृह असेही म्हणतात. आपल्या भारत देशात राज्यागणिक मतदारसंघ आहेत. लोकसभा हा शब्द संसदेच्या कनिष्ठ सभागृहाच्या पाठोपाठ निवडणुकांमधील कालावधीसही वापरतात. इ.स.२०१९पर्यंत भारतामध्ये १७ लोकसभा- कालावधी झाले आहेत. लोकसभेचे सदस्य हे जनतेने थेट निवडून दिलेले प्रतिनिधी असतात, अर्थात त्यांची भारताच्या पात्र प्रौढ नागरिकांचा समावेश असलेल्या मतदारसंघांतून थेट निवडणूक केली जाते. भारताच्या राज्यघटनेप्रमाणे लोकसभेचे साधारणतः ५५२ सदस्य असतात. यामधील ५३० सदस्य भारताच्या राज्यांचे प्रतिनिधी, २०पर्यंत सदस्य हे केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधी, तर २ सदस्य अँग्लो-इंडियन समाजाचे प्रतिनिधी असतात. जे की राष्ट्रपतीकडुन नामनिर्देषित केले जातात. पण १०४व्या घटनादुरुस्तीनंतर ही दोन पदे रद्द करण्यात आली आहेत.




लोकसभा हे भारतीय संसदेचे कनिष्ठ सभागृह आहे. लोकसभेचे सदस्य हे जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी असतात. लोकसभेची निवडणूक ही भारतीय प्रौढ नागरिकांचा समावेश असलेल्या मतदारसंघातून निवडून केली जाते. प्रत्येक लोकसभेचा कालावधी हा जास्तीत जास्त ५ वर्षाचा असतो. भारताची पहिली लोकसभा १९५१च्या सार्वजनिक निवडणुकीनंतर दि.१७ एप्रिल १९५२ रोजी अस्तित्त्वात आली. १९५७मध्ये ५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यावर ती विसर्जित केली गेली. याप्रकारे भारतात १७व्या लोकसभेची निवडणूक इ.स.२०१९ रोजी झाली. त्यामध्ये मतदान ७ टप्प्यात पार पडले. मतदानाचा पहिला टप्पा हा दि.११ एप्रिल २०१९ रोजी पार पडला. दुसरा टप्पा हा दि.१८ एप्रिल २०१९ला झाला, तिसरा टप्पा हा २३ एप्रिलला पार पडला, चौथा टप्पा २९ एप्रिलला झाला, पाचवा टप्पा ६ मे रोजी झाला, सहावा टप्पा १२ मे रोजी आणि सातवा टप्पा हा १९ मेला झाला. अशाप्रकारे सतराव्या लोकसभेच्या निवडणुकीत सात टप्प्यात मतदान झाले. मतमोजणी दि.२३ मे २०१९ रोजी पार पडली. महाराष्ट्र राज्यात एकूण ४८ मतदार संघ होते. सांप्रत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी हे वाराणसी या उत्तर प्रदेशातील मतदारसंघातून निवडून आले होते. भारतीय राज्यघटनेच्या कलम ८१ अनुसार लोकसभेची तरतूद केली गेली आहे. ती लोकसभेच्या रचनेसाठी लागू आहे. लोकसभा आणि राज्यसभा या दोघींमध्ये काय फरक आहे? बघा- लोकसभा हे भारतीय संसदेचे कनिष्ठ सभागृह आहे. हिची तरतूद ही भारतीय राज्यघटनेच्या कलम ८१च्या अनुसार केली आहे. यामध्ये धनविषयक प्रस्ताव मांडला जातो. तिचा कालावधी हा जास्तीत जास्त पाच वर्षाचा असतो. त्यामध्ये येणारे सदस्य हे लोकांमार्फत निवडून येतात. तर राज्यसभा हे भारतीय संसदेचे वरिष्ठ सभागृह आहे. तिची तरतूद ही भारतीय राज्य घटनेच्या कलम ८०च्या अनुसार केली आहे. तिचा कालावधी हा सहा वर्षाचा असतो. सहा वर्षाचा कालावधी असूनही येथे दर दोन वर्षांनी काही सदस्य निवृत्त होऊन त्या जागी नवीन सदस्य येतात. यामध्ये येणारे सदस्य हे राज्यांच्या विधानसभेने निवडून दिलेले असतात. निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेमध्ये काही महत्त्वाचे मुद्दे मांडले गेले होते, ते मुद्दे असे होते- सन २०१९च्या लोकसभा निवडणुकीमध्ये नव्वद कोटी इतके लोक म्हणजेच मतदारांनी मतदान केले. सन २०१४च्या तुलनेत यावेळी सात कोटी इतके मतदार वाढले होते. पहिल्यांदाच त्यात अठरा- एकोणीस वर्षे वयाच्या दीड कोटी मतदारांनी मतदान केले. आठ कोटी त्रेचाळीस लाख इतक्या नवीन मतदारांनी या निवडणुकीत मतदान केले. असेही निवडणूक आयुक्तांनी माहिती दिली होती, की ईव्हीएम- इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनच्या सुरक्षेसाठी सुद्धा काटेकोर नियम पाळत चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता व ईव्हीएमचे जीपियस ट्रॅकिंग करण्यात आले होते. मतदार यादीमधे आपले नाव आहे की नाही? हे पाहण्यासाठी निवडणूक आयोगाने हेल्पलाईन नंबर दिला होता. या हेल्पलाईन नंबरवर फोन करून खात्री पटवून घ्यावयाची होती. संवेदनशील भागांमध्ये सुरक्षेसाठी सीआरपीएफचे जवान तैनात करण्यात आले होते.

!! भारतीय प्रथम लोकसभा निवड दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!



- संकलन व शब्दांकन -
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
(एक प्राणी-पक्षी प्रेमी.)
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

# शेत रस्त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सस्ती अदालत उपक्रम राबविणार

**संवाद मराठवाड्याशी उपक्रमांतर्गत विभागीय आयुक्तांचा थेट शेतकऱ्यांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे संवाद**
**शिव रस्ते, पाणंद रस्ते याबाबत आठही जिल्हयातील शेतकऱ्यांनी मांडल्या अडचणी**
**तालुका पातळीवर दर पंधरवाड्याला सस्ती अदालत घेण्याचे निर्देश**

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शेतकरी बांधवांसाठी आपल्या शेतात जाण्यायेण्यासाठी शेतरस्ता, पाणंद रस्ता अत्यंत महत्वाचे असतात. गावनकाशाप्रमाणे अतिक्रमित व बंद झालेले शेत रस्ते, पाणंद रस्ते मोकळे करुन देण्यासाठी तालुका पातळीवर सस्ती अदालत उपक्रम राबविण्याचे निर्देश आज विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी दिले. शेतकरी बांधवांनी शेतरस्ते मोकळे देण्यासाठीच्या या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा असे आवाहनही त्यांनी केले.

मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातील नागरिक आपल्या शेतातील जाण्या-येण्याच्या रस्त्याबाबत अडचणी घेऊन विभागीय आयुक्त कार्यालयात प्रशासकीय अधिकारी यांच्या भेटीसाठी, निवेदने देण्यासाठी येतात. मात्र विभागीय पातळीवरील अधिकारी अनेकदा कामानिमित्त दौऱ्यावर किंवा अन्य कामामुळे त्यांची भेट होत नाही, हीच बाब विचारात घेत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी शेतकऱ्यांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे थेट संवाद साधण्यासाठीचा उपक्रम हाती घेतला आहे. आज शेतरस्ते शिव रस्ते, पाणंद रस्ते याबाबत विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी संवाद साधला. यावेळी अपर आयुक्त बाबासाहेब बेलदार, अपर आयुक्त के. आर.परदेशी, उपजिल्हाधिकारी उमाकांत पारधी, उपजिल्हाधिकारी शुभांगी आंधळे यांच्यासह संबंधित निवासी उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी उपस्थित होते.




विभागीय आयुक्त श्री.गावडे म्हणाले, जे रस्ते अस्तित्वात आहेत त्यांना क्रमांक देण्यात यावेत. शेतजमिनीमध्ये वहिवाट करण्यासाठी अस्तित्वात असलेले रस्ते काही ठिकाणी अरुंद आहेत. अशा ठिकाणी मोठी वाहने जाण्यास अडचण निर्माण होऊन तक्रारही होतात. सर्वच शिवपाणंद आणि शेतरस्त्यांची हद्द निश्चित करून त्यांची कामे दर्जेदाररीत्या पूर्ण करावी, शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर महसूल प्रशासनामार्फत योग्य ती कार्यवाही करावी, शेत वहिवाट रस्त्याची तक्रार सुनावणी तहसीलदार यांच्याकडे होते. अशी रस्त्यांबाबत प्रलंबित असलेली प्रकरणे एका महिन्यात निकाली काढावीत. असे स्पष्ट आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यांनी यापूर्वीच दिले आहेत.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेणे, त्यांचे निराकरण करण्यासाठी विभागातील सर्व निवासी उप जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांशी या वेबिनारच्या माध्यमातून चर्चा आणि अडचणीचे निराकरण करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

संभाजीनगर जिल्ह्यातील ईसारवाडी ता.पैठण येथील शेतकऱ्यांनी शेतरस्त्याबाबत आपली अडचण मांडली. विशाल घुले यांनीही पाणंद रस्त्याची समस्या बोलून दाखविली. वायगाव ता.पैठण येथील बबन बोबडे यांनी शेतरस्त्यासाठी प्रशासनाने मदत करावी अशी अपेक्षा व्यक्त केली. वैजापूर तालुक्यातून विपीन काळे यांनी गावात गावनकाशा ठळक स्वरुपात लावला तर गावातील शेतरस्ते मोकळे होण्यास मदत होईल, तसेच गट मोजणी करून हद्द निश्चित करावी अशी मागणी केली. याबाबत विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी श्री.काळे यांनी मांडलेली कल्पना निश्चितपणे चांगली असल्याचा उल्लेख केला. यामुळे शेतरस्ते, पाणंद रस्ते मोकळे होतील, संबंधित तालुका प्रशासनाने याबाबत कार्यवाही करावी तसेच नवीन रस्ते गावनकाशात समाविष्ठ करण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवावा, विभागीय आयुक्त कार्यालयाकडून धोरणात्मक निर्णयासाठी राज्याच्या जमाबंदी विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल असेही श्री.गावडे म्हणाले.

लातूर जिल्ह्यातून रामेश्वर शेटे, सुदर्शन पाटील, बळीराम पाटील, एकनाथ पांढरे यांनी शेतरस्त्याच्या अडचणी मांडल्या. याबाबत जिल्हा प्रशासनाने मोहिम स्वरुपात कालबद्ध कार्यक्रम राबवावा तसेच तालुका पातळीवर सस्ती अदालत उपक्रमाचे तातडीने नियोजन करावे. असे निर्देश विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी दिले.

नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथून भारत परबते यांनी पाणंद रस्ते, अतिक्रमणाबाबत आपली अडचण सांगितली. तसेच इतर शेतकऱ्यांनीही शेतरस्त्याबाबतच्या आपल्या अडचणी विषद केल्या.

हिंगोली जिल्ह्यातील अविनाश नरवडे यांनी शेतरस्ते अतिक्रमणाचा विषय सांगितला. याबाबत गरज तपासून पोलीस बंदोबस्तात रस्ता मोकळा करावा असे निर्देश दिले. विनोद राठोड यांनी पिंपळवंडी रस्त्याचा प्रश्न मांडला. त्यांच्यासह जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी चर्चेत सहभाग घेतला.

जालना जिल्ह्यातील बदनापूर येथून लक्ष्मण कुऱ्हाडे यांनी चर्चेत सहभाग घेतला. आमच्या गावात पाणंद रस्ते नाहीत, गेल्या अनेक वर्षांपासून आमचा यासाठी प्रयत्न सुरू आहे. शेतात जाण्यायेण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. श्री.कुऱ्हाडे यांच्या अडचणीबाबत विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी जालना जिल्हा प्रशासनाने हा विषय मार्गी लावून यासोबतच इतर शेतकरी बांधवांचाही प्रश्न मार्गी लावण्यासाठी तातडीने सस्ती अदालतीचे आयोजन करावे असे निर्देश दिले.

बीड जिल्ह्यातील शिरुर कासार, गेवराई येथील शेतकरी बांधवांनी आपल्या शेतरस्त्यांसंदर्भातील अडचणी मांडल्या. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी श्री.स्वामी यांनी शेत रस्ते मोकळे करण्यासाठी बीड जिल्हा प्रशासनाने केलेल्या नियोजनाबाबत माहिती दिली.

धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव, तुळजापूर, उमरगा येथून शेतकऱ्यांनी चर्चेत सहभाग घेतला.

परभणी जिल्ह्यातूनही अनेक शेतकऱ्यांनी शेतरस्ते, पाणंद रस्ते याबाबतच्या समस्या मांडल्या. याबाबत लवकरच सस्ती अदालत उपक्रम हाती घेणार असल्याचे जिल्हा प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

शेतरस्ते, पाणंद रस्ते बाबतच्या या संवादात मराठवाड्याच्या आठही जिल्ह्यातून संवाद साधण्यासाठी मोठ्या संख्येने शेतकरी चर्चेत सहभागी झाले होते. विभागीय पातळीवरुन ज्या शेतकऱ्यांशी आज संवाद होऊ शकला नाही त्या शेतकरी बांधवांशी संबंधित जिल्हा, तालुका प्रशासनाने सस्ती अदालतीच्या माध्यमातून संवाद साधून त्यांचे शेत रस्त्यांचे प्रश्न तत्परतेने मार्गी लावावेत असे निर्देश विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी दिले. अपर आयुक्त बाबासाहेब बेलदार यांनी शेतरस्ते व त्याबाबतच्या कायद्याबाबत माहिती दिली. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील जिल्हा व तालुका प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांनी या संवाद कार्यक्रमात सहभाग घेतला.

## जल व्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५चे उद्घाटन

# जलव्यवस्थापनात नागरिकांचा सहयोग आवश्यक- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी






**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पाण्याच्या उपलब्धतेनुसार पिण्याचे पाणी, सिंचनासाठी पाणी, उद्योगांसाठी पाणी असे नियोजन करणे, जलसंधारण उपाययोजना राबविणे याला जलव्यवस्थापन म्हणतात. या व्यवस्थापनात नागरिकांचा सहयोग असणे तसेच पाणी वापराचे भान व बचतीचे ज्ञान असणे गरजेचे आहे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले.

जल व्यवस्थापन कृती पंधरवाडा कार्यक्रमाचे उद्घाटन आज जिल्हा नियोजन सभागृहात पार पडले. हा पंधरवडा दि.१५ ते ३० एप्रिल दरम्यान राबविण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, मुख्य अभियंता जयंत गवळी, अधीक्षक अभियंता समाधान सब बिनवार, कार्य.संचालक संतोष तिरमणवार, 'वाल्मि' विभाग प्रमुख अविनाश गरुडकर, कार्यकारी अभियंता जाधव, मुख्य लेखापरीक्षक आर.डी. मुंदडा, निवृत्त कार्यकारी संचालक नागरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख जिल्हा परिषदेचे कृषी अधिकारी प्रकाश पाटील यांच्यासह जलसंपदा विभागाचे अधिकारी कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व जलपूजन करण्यात आले. उपस्थितांना जलबचत प्रतिज्ञा देण्यात आली.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, जल व्यवस्थापन कृती कार्यक्रम प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी. त्यात लोकसहभाग आवश्यक आहे. लोकांमध्ये जाऊन पाणी वापराचे नियोजन आणि बचत यासाठी जाणीव जागृती करणे आवश्यक आहे.

सर्वसामान्य नागरिकांनी पुढाकार घेऊन जल व्यवस्थापन कृती आराखड्यात सहभागी व्हावे. पाणी व्यवस्थापनासाठी जिल्हा प्रशासनाने गाव तिथे वड, जल पुनर्भरण, वृक्षारोपण, विहीर पुनर्भरण यासारखे विविध उपक्रम हाती घेतले आहेत. या उपक्रमात कृषी जलसंपदा, जलसंधारण या सर्व विभागांनी एकत्रित येऊन उपाययोजना कराव्या. नागरिक आणि सामाजिक संस्थांचा सहभाग ही त्यात आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्य अभियंता मुंदडा,संतोष तिरमनवार,अविनाश गरुडकर यांनी जलव्यवस्थापनाविषयी माहिती दिली. कार्यकारी अभियंता सबबिनवार यांनी प्रास्ताविकात जल व्यवस्थापन कृती पंधरवडा अंतर्गत आयोजीत कार्यक्रम ांची रुपरेषा सांगितली. सूत्रसंचालन अश्विनी देशपांडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रशांत जाधव यांनी केले.

**असा आहे जलव्यवस्थापन कृती पंधरवडा**

दि.१५- पंधरवडा प्रारंभ, दि.१६- जलसंपदा अधिकारी- कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व ई- ऑफिस प्रणाली कार्यान्वयन, दि.१७- स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, जलपुनर्भरण, दि.१८- शेतकरी - पाणीवापर संस्था यांच्याशी संवाद, दि.१९- भूसंपादन, पुनर्वसन इ. अडचणींचे निराकरण व संयुक्त कालवा पाहणी, दि.२०- कालवा स्वच्छता अभियान, दि.२१ एप्रिल- उपसा सिंचन पाणी वापर तक्रारी निरसन, दि.२२- अनधिकृत पाणी वापर (वाणीज्य व औद्योगिक) प्रकरणे शोध मोहिम, दि.२३- पीक पद्धत, उत्पादकता वाढ, पाण्याचे नियोजन इ. बाबत कृषी विभाग, जलसंपदा विभाग संयुक्त मार्गदर्शन, दि.२२४- सिंचन-ई प्रणाली, पाणी दर, पाणीपट्टी आकारणी प्रकरणांचा आढावा, दि.२५- विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र, सेवाभावी संस्था यांच्या समवेत संवाद व कृती कार्यक्रम, दि.२६- पाण्याचा पुनर्वापर न करता धरणात, नदीत सांडपाणी सोडण्यात येत असलेल्या प्रकरणांचा शोध घेणे, दि.२७- आपत्ती व्यवस्थापन म ार्गदर्शन, दि.२८- महसूल विभागाच्या समन्वयाने महामंडळाच्या संपादित जमिनीवरील अतिक्रमण निष्कासन कारवाई, दि.२९ पाणवापर संस्था सक्षमीकरण कार्यशाळा, दि.३० पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत समारोप सोहळा.

# णमोकार तीर्थ प्रचार रथ २५ शहरात फिरणा; संभाजीनगर येथे पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते व्दितीय प्रचार रथाचे लोकार्पन संपन्न



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

प.पू. आचार्य श्री देवनंदीजी गुरुदेव यांच्या प्रेरणेने नाशिक जिल्हयातील मालसाने येथे निर्माणाधीन णमोकार तीर्थाचा प्रचार रथ भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवा निमित्त २५ शहरात फिरणार आहे. दरवर्षी जैन समाजातर्फे भ. महावीर जन्मकल्याणक महोत्सव मोठ्या धूमधडाक्यात साजरा केला जातो. यानिमित्त प्रत्येक शहरात शोभायात्रा काढली जाते. यामध्ये विविध रथ शामिल होतात.

६ ते १३ फेब्रुवारी २०२६ रोजी णमोकार तीर्थाचा भव्य पंचकल्याणक महोत्साव संपन्न होणार आहे. त्या कार्यक्रमाची माहिती जनसामान्यांना व्हावी या उद्देश्याने प्रचार रथ बनविण्यात आले आहे. प्रथम प्रचार रथाचा उदघाटन पु.पू. आचार्य श्री देवनन्दिजी गुरुदेव एवं आचार्य श्री कुमूदनंन्दिजी गुरुदेव, मुनिश्री आर्षिकतीर्जी गुरुदेव यांच्या सानिध्यात णमोकार तीर्थ येथे झाला. तसेच छत्रपती संभाजीनगर येथे अशाच प्रकारच्या रथाचे लोकार्पन शहराचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मा. न्या.कैलास चांदीवाल व माजी महापौर विकास जैन, गुरफ्भक्त परिवाराचे ललीत पाटणी यांची उपस्थिती होती. ६ ते १३ फ ेब्रवारी २०२६ रोजी दरम्यान होणा- या पंचकल्याणक महोत्सव हा कार्यकम आंतरराष्ट्रीय स्तरावर होणार असुन या महोत्सवाचे प्रचार प्रसार व्हावा यासाठी या रथाची निर्मीती करण्यात आली आहे. सदर रथ महाराष्ट्रात नाशिक, संभाजी नगर, कोपरगांव, नांदगाव, मालेगांव, कन्नड, सोलापुर, नांदेड, कोल्हापुर, अकलूज,पुणे, औंढा, पैठण, सहिते अनेक शहरात एकाच वेळी फिरणार आहे. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

छत्रपती संभाजीनगर येथील प्रचार रथाच्या लोकार्पन वेळी आचार्य देवनंदीजी गुरफ्भक्त परिवाराचे नमोकार तिर्थाचे विश्वस्थ ललीत पाटणी, रवि पहाडे, विपीन कासलीवाल, देवेन्द्र काला महेंद्र ठोले, जितेद्र पहाडे, प्रकाश ठोले, मानिकचंद गंगवाल प्रकाश कासलीवाल डॉ.आर.सी.बडजाते, नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल, वर्धमान बाकलीवाल, मनोज दगडा, विनोद लोहाडे, महावीर सेठी,एम. आर.बडजाते, डॉ.रमेश बडजाते,शैलेश पाटणी, भरत ठोले आर.आर.पहाडे, निलेश काला, मनोज पाटणी, बाहुबली गंगवाल, शैलेश पाटणी,श्री.क्षेत्र कचनेर चे अध्यक्ष सुनिल पाटणी, राजु चांदीवाल, संतोष कासलीवाल, मनोज चांदीवाल, महावीर गगवाल, सुनिल सेठी, वर्धमान कासलीवाल, महावीर कासलीवाल, जीवन गंगवाल, प्रकाश लोहाडे, विजय कासलीवाल, मनोज काला, मुकेशे कासलीवाल, दिलीप कासलीवाल, अमित कासलीवाल, हेमंत गंगवाल, भिकचंद लोहाडे, अनिल कासलीवाल आदींची यावेळी उपस्थिती होती. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

# विचारांची मिरवणूक, एकतेचा जयघोष - वेरूळमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



**खुलताबाद**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती सोमवारी उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी माजी. सरपंच प्रकाश पाटील मिसाळ,ग्राम पंचायत उपसरपंच विजय राठोड, किशोर काळे, महामाया बुद्ध विहाराचे अध्यक्ष विनोद ढिवरे, साहेबराव पांडव, कारभारी ढिवरे,माजी उपसभापती विजय भालेराव वेरूळ गावाचे पोलीस पाटील रमेश ढिवरे,पोलीस कर्मचारी प्रमोद साळवे,तसेच ग्रामपंचायत सदस्य चंदू राठोड, शेख मसीयोद्दीन,राहुल निकुंभ,मिलिंद जाधव, कडूबा साळवे,हितेश ठाकरे,राजेश आडे, दिनेश श्रीसुंदर, साईनाथ लोखंडे,धीरज ढिवरे यांचे सह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

सायंकाळी सहा वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेसह सजवलेल्या रथातून मिरवणुकीची सुरुवात करण्यात आली.मुख्य भोसले चौकात भगव्या ध्वजास पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली.जय भीम,जय भारत अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. फटाक्यांची आतिषबा जी करत संपूर्ण परिसरात उत्सवम ूर्ती वातावरण निर्माण झाले.या मिरवणुकीत नव तरुणांच्या हाती असलेल्या फलक मधब डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह इतर महापुरुषांचे विचार प्रदर्शित करण्यात आले होते. त्यामध्ये भारतीय समाजात एकात्मता, बंधुभाव आणि अखंडतेचा संदेश झळकत होता.

भीमगीतांवर अनेक तरुण तरुणी ठेका धरले होते प्रेरणादायी गीतांवर वेरूळ ग्रामस्थ, महिला वर्ग आणि लहान मुले आनंदाने नाचत सहभागी झाले.या प्रसंगी संपूर्ण परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते. मिरवणुकीच्या मार्गावर अनेक ठिकाणी समाजबांधवांनी थंड पाण्याची व शरबत वाटपाची व्यवस्था केली होती. विशेष म्हणजे १४ एप्रिल ची रोजी वेरूळ गावात दोन व्यक्तीच्या अचानक मृत्यू झाली होती अल्पशा आजाराने निधन झालेले एकनाथ शिरसाट व विजेचे धक्का लागून अपघातात मृत्यूमुखी पडलेले संतोष आधाने यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आले होते

# श्री. साई हॉटेलचे लोकार्पण



१५ एप्रिल रोजी सायंकाळी जनता लॉजचे साई हॉटेलचे लोकार्पण फित कापून क्रांतीचौक पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनील माने यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे अफसर खान,राष्ट्रवादीचे शहर उपजिल्हाध्यक्ष शेख सलीम, माजी महापौर रशीद मामू आदीं ची उपस्थिती होती.

पान १ वरून

# शेतकऱ्यांनो जमिनी विकू नका, दलालांच्या भानगडीत पडू नका

बुधवारपासून प्रवाशांच्या सेवेत दाखल झाले आहे. राज्य सरकारच्या महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या अखत्यारितील अमरावती विमानतळाचा उद्घाटन सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. अलायन्स एअर कंपनीची मुंबई - अमरावती - मुंबई ही विमानसेवा सुरू झाली. या विमानतळावरून पहिल्या विमानाने सकाळी ११.३० वाजता उड्डाण केले. अलायन्स एअर कंपनीने अमरावतीवरुन मुंबई अशी विम ान सेवा सुरू केली आहे. अमरावती ते मुंबई अशा विमान प्रवासाचे प्रति व्यक्ती २१०० रुपयांचे तिकीट काढावे लागणार आहे. मुंबई-अमरावती तिकीट देखील याच किंमतीत उपलब्ध आहे. अमरावतीत पायलट ट्रेनिंग स्कूल (वैमानिक प्रशिक्षण केंद्र) सुरू होणार आहे. यूएस दक्षिण आशियामधील सर्वात मोठ पायलट ट्रेनिंग स्कूल असणार आहे. दरवर्षी येथे १८० पायलट तयार होतील, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. येथे ३४ विमाने पार्क (उभी) असतील. अलायन्सपाठोपाठ स्टार व इंडिगोची विमाने सुरू होणार आहेत.

# संविधानामुळे या देशातील ब्राह्मण मुख्य प्रवाहात गंगापूरकर



**नागपूर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

समकालीन व्यवस्थेचा परिणाम आजपण तत्कालीन ब्राम्हण समाजातील परिवर्तनवादी यांना सोसावं लागते किती दुरदुष्टी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना असेल आज जर ब्राह्मण समाज मुख्य प्रवाहात असेल तर ते फक्त भारतीय संविधानामुळे असे प्रतिपादन परिवर्तनशील ब्राह्मण मोर्चा चे अध्यक्ष अतुल गंगापूरकर यांनी केले ते आज आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा कास्टाईब कार्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते प्रथम अभिषेक मिश्रा यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण केला सितेज पखिडे यांनी दिपप्रज्वलन केले तर सुत्रसंचालन पुण्यशील बोदले यांनी केले कार्यक्रमात अवतेश दुबे, माया गुप्ता , रमेश गुप्ता, राघवेंद्र मिश्रा, रोहीत पांडे भागवत पांडे,लव कुश राम ायण, रमेश यादव,धिवेंद्र ठाकूर,रुपेश कुमार, सुरेश शाहू यांचे आंरिमो चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले ओबीसी नेते राजू पांजरे यांनी ओबीसी ब्राह्मण समाजाने विज्ञानाची कास धरली तर या देशातून अंधश्रद्धेचे निर्मूलन होईल, चरणदास गायकवाड यांनी सांगितले ब्राह्मण समाजातील नविन पिढी परिवर्तनाच्या लाटेवर स्वार झाले आहे त्यांना पण परिवर्तनाची पाहाट पाहिजे आहे सुरज ढोणे यांनी ब्राह्मण समाजाच्या युवकांचे आभार मानले तर आभारप्रदर्शन राजीव कांबळे यांनी केले.

# उष्णतेशी लढाःआज (दि.१७) कार्यशाळा

**छत्रपती संभाजीनगर** - वाढत्या तापमानामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्य, नागरी सम स्यांसंदर्भात सर्व संबंधित विभागातील अधिकारी- कर्मचाऱ्यांची गुरुवार दि.१७ रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात सकाळी १० ते दुपारी साडे १२ या वेळात ही कार्यशाळा होणार आहे. उपस्थितीचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनोद खिरोळकर यांनी केले आहे.

# रखरखत्या उन्हाळ्यात हिरवाईने नटलेले शुभ वर्तमान

## अरण्यम प्रकल्प;कातपूर येथे ४.२५ हेक्टरवर; १ लाख २७ हजार रोपांची घनवन लागवड



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पैठण तालुक्यात मौजे कातपूर येथे सामाजिक वनीकरण विभागामार्फत अरण्यम घनवन प्रकल्प साकारला आहे. या प्रकल्पात ४.२५ हेक्टर क्षेत्रावर १ लाख २७ हजार ५०० रोपांची लागवड यशस्वी करुन हे घनवन आकाराला आले आहे. सन २०२१ पासून हा प्रकल्प साकारला जात होता. आज तेथे निर्माण झालेली घनदाट हिरवाई वृक्षराजीच नव्हे तर पशुपक्षांसह जैवविविधता संवर्धनास पोषक ठरली आहे. एरवी रखरखत्या उन्हाळ्यात सावलीच्या शोध घेणाऱ्या मनासाठी हे हिरवाईने नटलेले गारवा देणारे शुभवर्तमानच होय.

कातपूर येथील अरण्यम प्रकल्पाविषयीचे सादरीकरण आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या समक्ष करण्यात आले. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, उपजिल्हाधिकारी (रोहयो) उमाकांत पारधी, सामाजिक वनीकरण विभागाच्या विभागीय वन अधिकारी कीर्ती जमदाडे, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, वुई फॉर एन्व्हायरमेंट सामाजिक संस्थेच्या मेघना बडजाते यांची उपस्थिती होती.

नाविन्यपूर्ण प्रकल्पअंतर्गत तीन वर्षात जिल्हा प्रशासनाने जायकवाडी पाटबंधारे कॉलनीच्या उत्तर बाजूस नारळीबाग मौजे कातपूर येथे अरण्यम हे घनवन साकारले आहे. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत या प्रकल्पासाठी आर्थिक तरतूद करण्यात आली होती. २१ कोटी ९६ लाख ६२ हजार २५३ रुपये इतका खर्च या प्रकल्पासाठी लागला असून प्रति रोप १७२ रुपये इतका खर्च लागला आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश जायकवाडी पाटबंधारे प्रकल्प परिसरामध्ये वृक्ष लागवड करून पशुपक्षांसाठी अधिवास निर्माण करणे हा होता. जैवविविधतेचे संवर्धन व पुनरुज्जीवन याद्वारे करण्यात आले. घनवन पद्धतीने स्थानिक वृक्ष प्रजातीचे संवर्धन करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कार्बन सिंक यामध्ये तयार केले जात आहे. दुर्मिळ आणि नामशेष होत असलेल्या वृक्षप्रजातींची जीन बँक या ठिकाणी तयार होत असून संशोधनासाठी विद्यार्थ्यांना येथे वाव असणार आहे. पाणी, हवा, पक्षी इत्यादीच्या माध्यमातून बीज प्रसार करून जमिनीवर जास्तीत जास्त वृक्ष लागवड होण्यासाठी या अरण्य प्रकल्पाचा फायदा होईल,असे सामाजिक वनीकरण विभागाच्या विभागीय वन अधिकारी कीर्ती जमदाडे यांनी प्रास्ताविकात सांगितले.

घनवन लागवड पद्धती- जपानी शास्त्रज्ञ अकिरा मियावाकी यांनी घनवन लागवड पद्धती विकसित केली. या पद्धतीच्या मशागत पद्धतीमध्ये काही बदल करून अरण्यम पद्धतीमध्ये रूपांतरित करून या प्रकल्पात साधारण ३०९ पेक्षा जास्त विविध जातीच्या वृक्षांची लागवड या ठिकाणी करण्यात आली आहे.

अरण्यमब घनवनाचे फायदे - अरण्य प्रकल्प हा इतर ठिकाणी राबविण्यासाठी एक पथदर्शी प्रकल्प असून जायकवाडी पाटबंधारे प्रकल्प तसेच पक्षी अभयारण्य येथे आहे. त्याचा परस्पर फायदा दोन्ही प्रकल्पांना होऊ शकतो. संशोधन तसेच पर्यटनासाठी या घन वनाचा फायदा होईल. पर्यटन स्थळ आणि दुर्मिळ वृक्ष प्रजातीचे परिचय केंद्र तथा संग्रहालय म्हणून हा प्रकल्प विकसित होऊ शकतो. यामुळे परिसरातील जैवविविधता विकसीत होऊन परिसरातील पर्यावरण संवर्धनाला गती येईल.

### दुर्मिळ वृक्ष प्रजातींची लागवड

एकूण ४.२५ हेक्टरवर १ लाख २७ हजार ५०० वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. त्यात कोकम, नील, नारळ, पाम, गोवर्धन, चंपा, सारंगी, जायफळ, भोकर, कुंदा, दालचिनी, तेजपत्ता, अगर, उड, अंजन, लीची यासारख्या उपयुक्त वनस्पतीची लागवड करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे औषधी महत्त्व असलेल्या अर्जुन, साल, ब्रह्मवेली, दुर्गाडा, जाय, लिली, निरगुडी, निळी, वेलची, वाळा, राकस, मेहंदी, शेवरी,ओवा, सदाफुली, काळीमिरी, तुळस, शतावरी, पुदिना, धोत्रा, कुसुम, रिठा, चाफा ,बोरसाल, केळी, नारळ, सौंदड, रुद्राक्ष, तगर, बोर, सुपारी, रक्तचंदन, लाल चाफा, देव चाफा ,पांगरा, पळसपांग्रा, धामण, हेरडा, पळस ,भोकर, काशीद ,गुलाब ,साग ,जुई, बदाम, सीता ,अशोका, तुळस, कापूर, तुळस ,कृष्णकमळ, आपटा, रुई, केवडा, चारोळी, चेरी ,मोह ,अशोक, खैर , कदंब तुती, मोगरा, जास्वंद, चांदीपाठ, रातराणी, उंबर ,आवळा, खारीक, बेहडा, जांभूळ ,मोहगणी, खारीक, चिंच, रामफळ, कनेर, ड्रॅगन फ्रुट यासारख्या वृक्षांची लागवड प्रकल्पात करण्यात आली आहे.

# उद्योग उभारणीसाठी विमानतळ आणि कनेक्टिव्हिटी महत्त्वाची - मुख्यमंत्री फडणवीस

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिथे विमानतळ आहे तिथे उद्योग उभे राहतात. यामुळे उद्योग हवे असतील तर विमानतळ आणि कनेक्टिव्हिटी महत्त्वाची आहे. यामुळे अमरावतीसह विदर्भामध्ये विमानतळ निर्मिती व विस्तारीकरणाचे काम सुरु आहे. अमरावती येथील विमानतळाची धावपट्टी यापुढील काळात ३००० मीटर इतकी करण्यात येईल. स्टेट ऑफ आर्ट असलेल्या अमरावती विमानतळ आणि पायलट प्रशिक्षण केंद्रामुळे अमरावतीला विशेष ओळख प्राप्त होणार आहे. येत्या काळात सिंचन, पायाभूत सुविधा यासोबतच सर्वसामान्य नागरिकांसाठी वेगवान प्रवासाच्या सुविधा निर्माण करण्यात येतील. विदर्भातील विकासात्मक कामे पूर्ण करून या भागाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम प्राधान्याने केले जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

अमरावती विमानतळाचे उद्घाटन, तसेच प्रवासी विमानसेवेचा शुभारंभ आणि एअर इंडिया पायलट प्रशिक्षण केंद्राच्या उड्डाणाचे प्रात्यक्षिक आज पार पडले. यावेळी केंद्रीय विमान वाहतूक मंत्री किंजरापू राम मोहन नायडू, केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कामगार मंत्री आकाश फुंडकर, अनुसूचित जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ, खासदार डॉ. अनिल बोंडे, बळवंत वानखडे, अमर काळे, आमदार संजय खोडके, डॉ. संजय कुटे, रवी राणा, सुलभा खोडके, प्रताप अडसड, केवलराम काळे, राजेश वानखडे, प्रविण तायडे, उमेश यावलकर, गजानन लवटे, नवनीत राणा, परिवहन व बंदरे विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लिमिटेडच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्याच्या विकासासाठी करण्यात येणाऱ्या करारामध्ये विदर्भाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. यामुळे विदर्भाचे चित्र बदलले आहेत. समृद्धी महामार्ग जेएनपीटी आणि वाढवण बंदराला जोडण्यात येणार आहे. यासोबतच वैनगंगा-नळगंगा प्रकल्पात विदर्भातील सात जिल्ह्यांचा समावेश राहणार आहे. यातून दहा लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असून शेतकऱ्यांना चांगल्या पद्धतीने शेती करता येणे शक्य होणार आहे. प्रकल्पामुळे या भागाचा चेहरामोहरा बदलणार आहे. हा प्रकल्प वेळेत पूर्ण करून विदर्भातील दुष्काळ कायमचा संपविण्यात येणार आहे. सिंचनाने कोरडवाहू शेती बागायती करण्यात येणार आहे. तसेच सहा हजार कोटी रुपये खर्च करून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबविण्यात येणार आहे.

विदर्भाच्या दृष्टिकोनातून अमरावती हे महत्त्वाचे स्थान आहे. या ठिकाणी पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर देण्यात येत आहे.

विमानतळामुळे आर्थिक क्रांती होणार असून या भागाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लाभ होणार आहे. तसेच रोजगाराच्या विविध संधी निर्माण होतील. विमानतळामुळे परिसराला नवी ओळख निर्माण होणार आहे. उद्योजकही विमानतळ असणाऱ्या भागाला प्राधान्य देऊन उद्योग उभारत असल्याने येथील टेक्स्टाईल उद्योगाला चालना मिळेल.

या ठिकाणी होऊ घातलेल्या पीएम मित्रा पार्कमुळे दोन लाख रोजगार निर्माण होणार असून कापूस ते कापड आणि पुढे फॅशनमुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना लाभ होणार आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

# नानाजी देशमुख संजीवनी प्रकल्प टप्पा दोन योजनेचा प्रेरणादायी शुभारंभ

**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील पळसवाडी गावामध्ये नानाजी देशमुख संजीवनी प्रकल्प टप्पा दोन अंतर्गत योजनांचा भव्य शुभारंभ उत्साहात पार पडला.या प्रसंगी कृषी मंडळ अधिकारी किशोर पाडळे यांनी शेतकऱ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यानंतर गावामध्ये मशाल दिंडी काढण्यात आली.

ज्यामध्ये शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाला.जिल्हा परिषद शाळा तालुका कृषी अधिकारी अंतर्गत व नाथ माध्यमिक विद्यालय,तसेच मुख्याध्यापक संतोष जगताप,शिक्षिका, अनुराधा कांबळे, ज्योती शिंदे,प्रियंका जाधव, सारिका नागे आणि नाथ माध्यमिक विद्यालयाचे मच्छिंद्र ठेंगडे



व कृषी मित्र किशोर जाधव यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी प्रभात फेरीत उत्स्फूर्त पणे भाग घेतला.

या प्रभात फेरीतून गावात योजनेची जनजागृती करण्यात आली.

या कार्यक्रमात संजय धबाले यांनी शेतकऱ्यांना योजना समजावून सांगितली व या योजनेचा लाभ कसा घ्यायचा,याचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच दगडू धनसिंग भेंडे उपसरपंच सोमीनाथ ठेंगडे,महेश दहिवाल,सीताराम पवार,ग्रामसेवक विनायक पवार. रामदास ठेंगडे.किशोर ठेंगडे, अण्णा काळे, बाळू काळे,कैलास गिरे,जनार्दन ओटे गावातील अनेक प्रगतशील शेतकरी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते उपस्थित होते.

# आपत्ती व्यवस्थापन परिचय प्रशिक्षण कार्यक्रमास प्रारंभ; 'सदैव सज्ज',हाच आपत्ती व्यवस्थापनाचा मंत्र-जिल्हाधिकारी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आपत्ती ही काही सांगून येत नाही. मात्र सततचा अभ्यास, प्रशिक्षणाद्वारे सदैव सज्ज राहिल्यास आपण संभाव्य आपत्तीचा सामना करून जीवित व वित्त हानी टाळू शकतो, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन परिचय प्रशिक्षण कार्यक्रमाचा आज सरस्वती भुवन विद्यामंदिरात प्रारंभ करण्यात आला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनोद खिरोळकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मारुती म्हस्के, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे लेफ्ट. आर. जी. यादव, सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. दिनेश वकील, डॉ.




रश्मी बोरीकर, मुख्याध्यापक निकुंभ, डॉ. सविता मुळे,श्रीमती आश्विनी भोसले आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, आपत्तीचे अनुमान करता येत नाही. मात्र आपत्तीचा सामना करण्यासाठी आपण सज्ज राहू शकतो. या परिचय प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे आपण हिच सज्ज असण्याची तयारी करत आहोत. आपल्या घरातील लहान लहान प्रसंगात ही सज्जता आपल्याला उपयोगी पडते. शालेय विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून हे प्रशिक्षण देऊन आपत्ती व्यवस्थापन सज्ज नागरिक घडवण्याचे उद्दिष्ट आहे. हेच विद्यार्थी उद्याचे नागरिक आहेत. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे विविध सत्र जिल्ह्यात आयोजित केले आहेत. आपत्ती व्यवस्थापनातून सज्जतेचे धडे घेऊन येणाऱ्या आपत्तीना आपण सामोरे जाण्यासाठी सज्ज होऊ. प्रास्ताविक आश्विनी भोसले यांनी तर अध्यक्षीय समारोप ॲड. वकील यांनी केला. मंगेश डोलारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# सशस्त्र सेना ध्वज दिन निधीसाठी योगदान देण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आपल्या देशासाठी बलिदान दिलेल्या व संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या सैनिकांच्या सहाय्य व गौरवासाठी 'सशस्त्र सेवा ध्वज निधी संकलन मोहीम २०२४-२५' राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यास १ कोटी ३४ लाख रुपये इतका इष्टांक देण्यात आला आहे. या निधी संकलनात जिल्ह्यातील नागरिकांनी योगदान द्यावे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

आपला निधी नागरिकांनी व सर्व शासकीय विभागांनी धनादेश, धनाकर्ष अथवा रोखीने जिल्हाधिकारी अध्यक्ष जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, छत्रपती संभाजीनगर ४१, सैनिक संकुल, नंदनवन कॉलनी, छत्रपती संभाजीनगर येथे जमा करावा. अथवा बँक ऑफ महाराष्ट्र शाखा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर मधील खाते क्रमांक २०११७३६९१९३ , आयएफसी कोड चअकइ०००१५२ मध्ये ही रक्कम NETF/RTGS द्वारे जमा करता येईल. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, छत्रपती संभाजीनगर दुरध्वनी ०२४०-२३७०३१३ किंवा भ्रमणध्वनी ९०४५६७७७३० वर संपर्क साधावा,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**